मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या गुरुवार दिनांक २४ जून १९९३ रोजी संपन्न झालेल्या ८ व्या बैठकीचा स्थायी करण्यांत आलेला कार्यवृत्तांत.

Confirmed in the 9th meeting on 28/7/93.

गुरुवार दिनांक २४ जून १९९३ रोजी झालेल्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या ८ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

गुरुवार दिनांक २४ जून १९९३ रोजी सकाळी ११.०० वाजता मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची ८ वी बैठक गृहनिर्माण भवनाच्या तिसऱ्या मजल्यावरील सभागृहात संपन्न झाली. या बैठकीस पुढील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १] | डॉ. शंकर वा. सटकर | सभापती |
| २] | श्री. हेमराज शाहा | उपसभापती |
| ३] | श्री. पं. दो. वाणी | मुख्य अधिकारी |
| ४] | श्री. यादवराव कांबळे<br>उपसचिव, गृहनिर्माण<br>व विशेष सहाय्य विभाग. | सदस्य |
| ५] | श्री. पोतदार<br>प्रमुख अभियंता, मुंबई महानगर<br>पालिका यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ६] | श्री. रॉकी क्रास्टो | -"- |
| ७] | श्री. विवेक भर्तू | -"- |
| ८] | श्री. महमद फारुख मन्सुरी | -"- |
| ९] | श्री. व्ही. बी. वरसकर | -"- |
| १०] | श्री. शंकरराव पिटले | -"- |
| ११] | श्री. गजेन्द्र लष्करी | -"- |
| १२] | श्री. श्रीकांत पाटील, | -"- |
| १३] | श्री. चेतन शाहा | -"- |
| १४] | श्री. कमलाकर शर्मा | -"- |
| १५] | श्री. महंमद आजम खान | -"- |
| १६] | श्री. प्र. स. काजरोळकर<br>उपकर निर्धारक व संकलक<br>मुंबई महानगरपालिका | निमंत्रित. |

मा. सभापती डॉ. शंकर वा. नेवटकर, यांचे अध्यक्षतेखाली बैठकीस प्रारंभ झाला. प्रारंभी मा. सभापती, उपसभापती, सदस्य, अधिकारी व निमंत्रित यांचे स्वागत करण्यात आले.

बाब क्रमांक : ८.१ :

विषय :- दिनांक २५.५.९३ रोजी झालेल्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ च्या ७ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करणे.

पृष्ठ क्रमांक १ ते २३ वर कार्यवृत्तांत सादर केलेला आहे. त्यावर सविस्तर चर्चा झाली. श्री. गजेन्द्र लष्करी, सदस्य यांनी असे निदर्शनास आणून दिले की, बाब क्रमांक ७.५ वरील चर्चेच्या वेळी दंगल व बॉम्ब स्फोटके क्षतिग्रस्त झालेल्या इमारतींच्या दुरुस्तीसाठी शासनाने निधी उपलब्ध करुन द्यावा. अशी मागणी त्यांनी केली होती, त्याची कार्यवृत्तांतात नोंद झालेली नाही. सविस्तर चर्चेअंती पृष्ठ क्र. १३ वरील ७ व्या ओळीच्या सुरवातीस श्री. गजेन्द्र लष्करी व अन्य सदस्यांनी अशी सुधारणा करावी असे ठरले. सविस्तर चर्चेअंती वरील सुधारणेसह दिनांक २५ मे १९९३ रोजी झालेल्या मंडळाच्या ७ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्यात आला.

बाब क्रमांक : ८.५ :

विषय :- अनुपालन अहवाल.

पृष्ठ क्रमांक १२९ ते १४१ तसेच पृष्ठ क्र. २११ ते २२३ वर सादर केलेल्या अनुपालन अहवालावर चर्चा झाली. श्री. शंकरराव पिटला, सदस्य यांनी मागील बैठकीत "परिश्रम" या पुनर्रचित इमारतीमधील गाळे १०८ ताल्या घारपुरे पथ येथील इमारतीमधील रहिवाश्यांना करो

वितरित झाले. हा प्रश्न विचारला होता. मुख्य अधिकारी यांनी खुलासा केला की, हे गाळे १९७७ साली वितरित झाले असल्यामुळे या विषयीचा सविस्तर तपशिल उपलब्ध होवू शकलेला नाही. तोडाणी वाडी या धोकादायक इमारतीमधील रहिवाश्यांना काढून इमारत पाडून टाकण्याच्या संदर्भात खुलासा करण्यात आला की, दिनांक ११ जून १९९३ रोजी हा कार्यक्रम निश्चित केला होता. परंतू त्यादिवशी मुंबईमधील तंग परिस्थिती व पोलिसांचा नाकाबंदीचा कार्यक्रम लक्षात घेवून पोलिसांच्या सुचनेनुसार कार्यक्रम पुढे ढकलण्यात आलेला आहे. पोलिसांच्या मदतीने लवकरच हा कार्यक्रम कार्यान्वित करण्यात येईल. सर्वश्री गजेन्द्र लष्करी, शंकरराव पिटला व अन्य सदस्यांनी असे निदर्शनास आणून दिले की, निधीअभावी दुरुस्तीची कामे बंद आहेत असा ठेकेदारांकडून जनतेमध्ये प्रचार केला जात आहे, त्यामुळे सदस्यांना रहिवाश्यांच्या असंतोषाला तोंड द्यावे लागत आहे. मुख्य अधिकारी यांनी या संदर्भात खुलासा केला की, निधीची उपलब्धता लक्षांत घेवूनच दुरुस्तीच्या अंदाजपत्रकांना मंडळाने मंजूरी दिलेली आहे. त्यामुळे निधीअभावी बंद पडण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. यावर श्री. रॉकी क्रास्टो, सदस्य यांनी निदर्शनास आणून दिले की, ते रहात असलेल्या इमारती दुरुस्तीचे काम गेले ३ महिने बंद आहे, त्यामुळे गेले तीन महिने त्यांना घराबाहेर रहावे लागत आहे. यावर सर्वच सदस्यांनी तक्रार केली की, दुरुस्तीची खरोखर आवश्यकता असलेल्या इमारतीची दुरुस्ती होत नाही व अनावश्यक ठिकाणी दुरुस्तीची कामे होतात. दुरुस्ती हाती घेतलेल्या इमारतीची कामे सुरु करून निधीचे कारण सांगून कामे बंद ठेवली जातात. सविस्तर चर्चेअंती मुख्य अधिकारी यांनी आदेश दिले की, सदस्यांनी तक्रार केलेल्या इमारतींची संबधित उपमुख्य अभियंता यांनी पहाणी करून पुढील बैठकीत अहवाल सादर करण्यात यावा.

१२०



सर्वश्री गजेन्द्र लष्करी, फारुख मन्सुरी व अन्य सदस्यांनी निदर्शनास आणून दिले की, दंगलीमध्ये व बॉम्बस्फोटात हानी पोहोचलेल्या इमारतींच्या दुरुस्तीसाठी मंडळाने शासनाने अनुक्रमे रुपये २.१० कोटी व रुपये १.३६ कोटी एवढ्या निधीची मागणी केलेली आहे. शासनाच्या सूचनेनुसार मंडळाने स्वतःचा निधी वापरुन वरील इमारतींची युध्दपातळीवर दुरुस्ती केलेली आहे. काही इमारतींचा दुरुस्ती खर्च प्रमाणित करण्याकरिता तांत्रिक सल्लागारांकडे गेल्यामुळे ही कामे अर्धवट अवस्थेत आहेत. त्यामुळे सदस्यांना जनतेच्या टीकेला तोंड द्यावे लागत आहे. मा. सभापतींनी शासनाचे उपसचिव श्री. यादवराव कांबळे यांना सभागृहाच्या भावना लक्षात घेवून मंडळाने मागणी केलेला निधी तातडीने उपलब्ध करुन द्यावा, अशी विनंती सर्व सदस्यांच्या वतीने केली. या संदर्भात उपसचिव श्री. कांबळे यांनी प्रतिपादन केले की, मंडळाने सादर केलेला प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला आहे व तो शासनाच्या विचाराधीन आहे. मा. सभापतींची विनंती शासनाच्या निदर्शनास आणून देण्याचे श्री. कांबळे यांनी मान्य केले. श्री. शंकरराव पिटला, सदस्य यांनी निदर्शनास आणून दिले की, संक्रमण शिबिर विभागाची कार्यालये वान्द्रे व ताडदेव येथे असल्यामुळे लोकांना दोन्ही ठिकाणी फेऱ्या माराव्या लागतात व त्यांत लोकांचा फार वेळ खर्च होतो व कामाचे खाडे होतात. लोकांना होणारा हा त्रास कमी होण्याच्या दृष्टीने संक्रमण शिबिर विभागाची सर्व कार्यालये वान्द्रे येथे असावीत अशी सूचना श्री. पिटला यांनी केली. या सूचनेवर विचार करण्याचे मान्य झाले.

बाब क्रमांक : ८.२ :

विषय :- "अ" वर्गातील उपकरपात्र इमारतींच्या पुनर्विकासासाठी " ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करावयाचे प्रस्ताव.

भूकर पहाणी क्रमांक ३७० गिरगांव विभाग येथील "पिंपळवाडी" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेचा पुनर्विकास करण्याचा प्रस्ताव पृष्ठ क्रमांक २५ वर सादर केला आहे.

८

मुख्य अधिकारी यांनी सभागृहास माहिती दिली की वरील मालमत्तेच्या मालकाने पुनर्विकासासाठी परवानगी मिळावी यासाठी उच्च न्यायालयांत रीट पिटीशन क्रमांक ६२५/८९ अन्वये दावा दाखला केला होता. न्यायालयाने सदर दावा फेटाळून लाविला असून या जागेवर प्राधिकरणाने योजना राबवावी असा आदेश दिला आहे. मात्र घरमालकास अपील करण्याच्या दृष्टीने दिनांक ८ जुलै १९९३ पर्यंत सदर जागेची विद्यमान स्थिती कायम ठेवण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे ८ जुलै १९९३ पर्यंत यासंदर्भात कोणताही निर्णय घेता येणार नसल्यामुळे या विषयावर पुढील बैठकीत निर्णय घ्यावा असे ठरले.

बाब क्रमांक : ८.३ :

विषय :- म्हाडा अधिनियम ८८ ]३ अ अन्वये प्रमाणपत्र वितरित करणे.

१४५ एफ, साने गुरुजी मार्ग "ई" विभाग या इमारतीस म्हाडा अधिनियम उपकलम ८८ [३] [अ] अन्वये दुरूस्तीच्या प्रमाणित मर्यादेच्या पलिकडील असे घोषित करण्याविषयीचे प्रमाणपत्र प्रदान करण्याचा प्रस्ताव पृष्ठ क्रमांक ३७ वर सादर केला आहे. या विषयावर सविस्तर चर्चा होवून सदर प्रमाणपत्र प्रदान करण्याचा निर्णय घेण्यात आला.

ठराव क्रमांक : ८.५०

१४५ एफ, साने गुरुजी मार्ग "ई" विभाग या इमारतीस दुरूस्तीच्या प्रमाणित मर्यादेपलिकडील असे प्रमाणपत्र म्हाडा अधिनियम उपकलम ८८ [३][अ] अन्वये प्रदान करण्याचा निर्णय घेण्यात आला.

(१८९)



ठराव क्रमांक : ८.४ :

विषय :- उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीचे प्रस्ताव.

पृष्ठ क्रमांक ४५ ते १२७, पृष्ठ क्रमांक १८९ ते २०९ अन्वये सादर केलेल्या उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्याच्या प्रस्तावावर चर्चा झाली.

मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, दुरुस्ती खर्चाच्या अंदाजपत्रकास सुधारीत मंजूरी देण्याचे १३ प्रस्ताव व नियमित दुरुस्तीच्या खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्याचे १५ प्रस्ताव सादर केले आहेत. पटणी समितीच्या शिफारशीनुसार इमारतीस गुणानुक्रम देवून दुरुस्तीचे प्राधान्य ठरविले आहे. या सर्व अंदाजपत्रकांच्या खर्चाची रक्कम रुपये ८०.३८ लक्ष एवढी होत आहे. १९९३-९४ या आर्थिक वर्षाच्या तीन महिन्यांत दुरुस्ती कामासाठी सुमारे रुपये ४.६४ कोटी एवढा निधी खर्च होणार आहे. त्यामुळे दुरुस्ती कामांच्या खर्चास प्रशासकीय मंजूरी द्यावी असे मुख्य अधिकारी यांनी सभागृहास प्रतिपादन केले.

या विषयावर सविस्तर चर्चा झाली. सर्व सदस्यांनी तक्रार केली की, दुरुस्ती कामावर योग्य प्रकारे देखरेख होत नसल्याने दुरुस्ती कामाचा दर्जा योग्यप्रकारे राखला जात नाही. त्यामुळे या निधीचा योग्य प्रकारे विनियोग होत नाही. शासनाचे उपसचिव श्री. कांबळे यांनी सूचना केली की, सार्वजनिक बांधकाम विभाग व पाटबंधारे विभाग यामध्ये विविध स्तरावरील अभियंत्यांकडून कामांची नियमित पहाणी केली जाते. व त्याचे अहवाल सादर केले जातात. या धर्तीवर मंडळाच्या अभियंत्यांकडून कामांची नियमित पहाणी झाल्यास बांधकामाच्या दर्जावर नियंत्रण ठेवता येईल. मुख्य अधिकारी यांनी खुलासा केला की, नुकतीच एका परिपत्रकाद्वारे सर्व अभियंत्यांना पहाणीचे निकष ठरवून दिलेले आहेत. शिवाय दुरुस्ती कामाचे स्वरुप व व्याप्ती विशिष्ट प्रकारची असल्यामुळे त्याची तुलना सार्वजनिक

बांधकाम किंवा पाटबंधारे विभागाच्या कामाशी करता येणार नाही. कामाचे स्वरुप नियमित बांधकामापेक्षा वेगळ्या स्वरुपाचे असल्याचे विशिष्ट प्रकारचे ठेकेदारच ही कामे करु शकतात. यापैकी बहुतेक ठेकेदार अशिक्षित असून त्यांना सामाजिक बांधीलकीची जाणीव कमी असते. त्यामुळे या ठेकेदारांनाही प्रशिक्षण देण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. सविस्तर चर्चेअंती सादर केलेल्या दुरुस्ती अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी देण्याचा निर्णय घेण्यांत आला.

ठराव क्रमांक : ८.५१

परिशिष्ट "अ" मध्ये दर्शविलेल्या१३ इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तींच्या खर्चास सुधारित प्रशासकीय मंजूरी देण्याचा व परिशिष्ट "ब" मध्ये दर्शविलेल्या १५ इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तींच्या खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्याचा निर्णय एकमताने घेण्यांत आला.

बाब क्रमांक : ८.६ :

विषय :- सहकारी गृहनिर्माण संस्था कक्ष यांचे प्रस्ताव.

५९, ए,बी,सी,डी,ई, आपटे चाळ, डॉ. मोजेस मार्ग, वरळी मुंबई-१८ या उपकरपात्र इमारतीमधील गाळेधारकांच्या सिध्दिविनायक [नियो.] सहकारी गृहनिर्माण संस्थेने इमारती सुस्थितीत ठेवण्याच्या उद्देशाने सादर केलेला भूसंपादनाचा प्रस्ताव पृष्ठ क्रमांक १४३ वर सादर केलेला आहे. मुख्य अधिकारी यांनी सांगितले की मंडळाने या प्रस्तावाची छाननी केली असून म्हाडा अधिनियम १०३ [ब] मधील तरतुदींनुसार हा भूसंपादनाचा प्रस्ताव परिपूर्ण आहे. स्वबळावर दुरुस्तीची जबाबदारी स्विकारणाऱ्या रहिवाशांना प्रोत्साहन द्यावे. हे शासनाचे धोरण असल्यामुळे या

(१८९) ९५

प्रस्तावास मंजूरी द्यावी, अशी विनंती त्यांनी केली.
सविस्तर चर्चेअंती या प्रस्तावास मंजूरी देण्यांत आली.

ठराव क्रमांक : ८.५२ :

५९, अ. बी. सी. डी. ई. आपटे चाळ, डॉ. ई मोजेस रोड, वरळी, मुंबई-१८ या उपकरपात्र इमारतीमधील गाळे-धारकांच्या नियोजित सिध्दिविनायक सहकारी गृहनिर्माण संस्थेने इमारती सुस्थितीत ठेवण्याच्या उद्देशाने तेथील भूखंड व त्यावरील इमारतीचे त्या संस्थेकरितां भूसंपादन करण्यांच्या प्रस्तावास एकमताने मंजूरी देण्यांत आली.

८ व्या बैठकीची पुरवणी कार्यसूची पृष्ठ क्रमांक १५५ ते १८७ वर सादर केली आहे. या संदर्भात सदस्यांनी हरकत घेतली की, ही कार्यसूची सभेच्या आधी दोन दिवस मिळाल्या-मुळे विषयाचा अभ्यास करण्यास पुरेसा अवधी मिळालेला नाही. त्यामुळे या विषयसूचीवर पुढील बैठकीत चर्चा व्हावी. मुख्य अधिकारी यांनी यासंदर्भात खुलासा केला की, बाब क्रमांक ८.४ व ८.५ वर चर्चा होवून निर्णय घेण्यांत आला आहे. बाब क्रमांक ८.७.१ व ८.७.२ हे तांतडीचे विषय असल्यामुळे त्यावर निर्णय घेणे आवश्यक असल्यामुळे आजच्या बैठकीत या विषयावर चर्चा व्हावी अशी त्यांनी विनंती केली व मा. सभापतीनी ही विनंती मान्य केली.

बाब क्रमांक : ८.७.१

विषय :- सन १९९३ च्या पावसाळ्यांत विशेष बाब म्हणून कंत्राट-दारांच्या जबाबदारीवर व खर्चातून घनकचरा उचलण्याबाबत टिप्पणी.

वरील विषयाची टिप्पणी पृष्ठ क्रमांक २२५\वर सादर केलेली आहे. त्यावर चर्चा झाली. उपमुख्य अभियंता [दक्षिण] यांनी निवेदन केले की या कामासाठी निविदा

मागवूनही प्रतिसाद मिळालेला नाही. रस्त्यावरील व पदपथावरील धनकचरा पावसाळ्यात तातडीने उचलण्याची आवश्यकता असल्यामुळे स्पॉट कोटेशन मागवून दुरुस्तीच्या संबंधित ठेकेदारांच्या खर्चाने व जबाबदारीवर धनकचरा उचलण्याचा प्रस्ताव सादर केलेला आहे. कामाची निकड लक्षात घेऊन या प्रस्तावास मंजूरी द्यावी अशी त्यांनी विनंती केली. सविस्तर चर्चेअंती या प्रस्तावास मंजूरी देण्यात आली.

ठराव क्रमांक : ८.५३

इमारतींच्या दुरुस्ती कामामुळे रस्त्यावर व पदपथावर जमा झालेला धनकचरा स्पॉट कोटेशन मागवून दुरुस्ती कामांच्या संबंधित ठेकेदारांच्या खर्चाने व जबाबदारीवर उचलण्यासंबंधी उपमुख्य अभियंता [दक्षिण] यांनी सादर केलेल्या प्रस्तावास एकमताने मंजूरी देण्यात आली.

बाब क्रमांक : ८.७.२ :

विषय :- इमारत क्रमांक ७-७अ पिठा स्ट्रीट "अ" विभाग प्रशासकीय मान्यतेपेक्षा जास्त झालेल्या खर्चाविषयी.

वरील विषयाची टिप्पणी पृष्ठ क्रमांक २२९ वर सादर केली आहे. उपमुख्य अभियंता [दक्षिण] यांनी कोणत्या परिस्थितीत दुरुस्तीच्या खर्चात वाढ झाली होती याचे स्पष्टीकरण केले व प्रस्ताव सादर केला की, या कामावर झालेला वाढीव खर्च मंडळाने उपकरातर्फे उपलब्ध होणाऱ्या निधीमधून करावा व सदर रक्कम सुधारित अंदाज पत्रकामध्ये समाविष्ट करावी. सविस्तर चर्चेअंती सदर प्रस्तावास मंजूरी देण्यात आली.

ठराव क्रमांक: ८.५४

इमारत क्रमांक ७-७अ, पिठा स्ट्रीट "अ" विभाग या दुरुस्ती कामाची विशिष्ट परिस्थिती लक्षात घेऊन दुरुस्ती कामावर झालेला वाढीव खर्च उपकरातर्फे उपलब्ध

होणा-या निधीमधून करावा व सदर खर्चाच्या रक्कमेचा समावेश करून सुधारित अंदाजपत्रक मंजूरीसाठी सादर करावे.

हा प्रस्ताव विशेष बाब म्हणून मंजूर करण्यात आला.

बाब क्रमांक : ८.७ :

विषय :- अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळचे विषय.

[१] संरचनात्मक दुरूस्ती खर्चाच्या प्रमाणात मर्यादित रूपये ७५०/- प्रति चौ.मी. एवढी वाढ झाल्यामुळे त्या प्रमाणात दुरूस्ती उपकरात वाढ होण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन मुख्य अधिकारी यांनी केले. शासनाचे उपसचिव श्री. यादवराव कांबळे, यांनी माहिती दिली की, दुरूस्ती उपकरात वाढ करण्यासंबंधीचा प्रस्ताव शासनास सादर केला असून त्यासंबंधी पाठपुरावा करण्यात येत आहे. श्री. काजरोळकर, उपकर निर्धारक व संकलक यांनी म मुंबई महानगरपालिकेतर्फे करण्यात आलेल्या दुरूस्ती उपकराच्या वसुलीबाबत सविस्तर माहिती सभागृहास दिली. गेल्या वर्षात रूपये ७८.१४ लक्ष एवढा दुरूस्ती उपकर वसुल करून रिझर्व्ह बँकेत जमा केल्याची माहिती त्यांनी दिली.

[२] श्री. गजेन्द्र लष्करी, सदस्य यांनी सर्व सदस्यांच्या सह्या असलेले एक निवेदन मुख्य अधिकारी यांना सादर केले. या संदर्भात त्यांनी प्रतिपादन केले की, पुनर्रचित इमारतीमधील गाळेवाटपाच्या संदर्भात सुसुत्रतेचा अभाव दिसून येतो व गाळे उपलब्ध असूनही रहिवाश्यांना संक्रमण शिबिरात राहावे लागते. या वितरण पध्दतीत सुधारणा होण्याच्या दृष्टीने एक विशेष बैठक आयोजित करून बैठकीस सर्व

[illegible] अशी त्यांनी सूचना केली. या विषयावर सविस्तर चर्चा झाली. श्री. चेतन शाहा यांनी तक्रार केली की रहिवाशांना अधिकाऱ्यांकडून योग्यप्रकारची वागणूक मिळत नाही. श्री. वरसकर यांनी निदर्शनास आणून दिले की, लॉटरीच्या वेळेस सर्वांना बोलाविले जात नाही. श्री. शंकरराव पिळणकर यांनी सूचना केली की, लॉटरीच्या वेळी झालेला निर्णय सर्व संबंधितांना कळविण्याची आवश्यकता आहे. श्री. कांबळे, उपसचिव यांनी सांगितले की, तळमजल्यावरील रहिवाश्यांना पांचव्या मजल्यावर गाळा वितरित करण्याविषयीच्या अनेक तक्रारी शासनाकडे आलेल्या आहेत. या संदर्भात आवश्यक तो खुलासा करण्यांत आला. या चर्चेच्या वेळी मा. सभापतींनी असे निदर्शनास आणून दिले की, "रावते चाळ " ही इमारत पूर्ण होवून दोन महिने झाले आहेत. गाळे वितरण होणार हे गृहीत धरुन रहिवाशांनी आपल्या मुलांना प्रभादेवी परिसरातील शाळेत प्रवेश घेवून दिला आहे. मा. सभापतींनी वारंवार सूचना देवूनही "रावते चाळ" या इमारतीमधील गाळ्याचे वितरण अद्याप झालेले नाही. यावर उपमुख्य अधिकारी [पु.गा.] यांनी आश्वासन दिले की, १० दिवसांत "रावते चाळ" या पुनर्रचित इमारतीमधील गाळ्याचे वितरण करण्यांत येईल.

मुख्य अधिकारी यांनी या विषयावरील सर्व सदस्यांच्या भावना लक्षांत घेवून पुनर्रचित इमारतीमधील गाळ्याचे वितरण शक्यतो किमान वेळेत होणे आवश्यक आहे असे सांगितले. गाळे वितरणासाठी शासनाने विनियम ठरवून दिले आहेत व त्या विनियमानुसार गाळे वितरण होणे आवश्यक आहे. रहिवाश्यांना कमित कमी त्रास होवून गाळे वितरण अधिक प्रभावीपणे करता यावे याविषयीच्या सूचना सदस्यांनी सादर केल्यास त्यावर उचित कार्यवाही करता येईल अशी विनंती मुख्य अधिकारी यांनी केली.

23

[३] उपकरपात्र इमारतींच्या पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाण पत्र प्रदान केलेल्या प्रस्तावांच्या संदर्भातील प्रगतीचा सविस्तर तपशिल विधानसभा कामकाजाच्या संदर्भात शासनास सादर करावा, अशी विनंती उपसचिव श्री. कांबळे यांनी केली व ही विनंती मान्य करण्यांत आली.

[४] मंडळाची पुढील बैठक बुधवार दिनांक २८ जुलै १९९३ रोजी सकाळी ११.०० वाजतां आयोजित करावी असे एकमताने ठरले.

माननीय सभापती, उपसभापती, सदस्य, अधिकारी व निमंत्रित यांचे आभार मानल्यानंतर अध्यक्षांच्या परवानगीने सभा समाप्त झाल्याचे जाहिर करण्यात आले.

सभापती,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना
मंडळ, मुंबई.

मा. सदस्य श्री. विवेक भट यांनी असा मुद्दा उपस्थित केला की. तसेच ज्या अनिवासी गाळे धारकांना पुनर्रचित इमारतीत गाळा मिळाला नाही, अशांची यादी तयार करून त्यांना सामावून घेण्याच्या दृष्टीने मुख्य अधिकारी यांनी मुंबई नगरपालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करावी व सध्याच्या धोरणात त्या अनुषंगाने बदल करण्यासाठी प्रयत्न करावेत असे ठरले.

उपरोक्त सुधारणेसह आठव्या बैठकीचा कार्यवृत्तांत संमत करणेत आला.

सचिव
मुं इ दु व पु मंडळ

२५

## परिशिष्ट "अ"

दिनांक २४.६.९३ रोजी झालेल्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या ८ व्या बैठकीत मंजूर केलेले इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीचे सुधारीत प्रस्ताव.

| अ.क्र. | इमारतीचे नांव | विभाग | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | ९७-९९ जंजीकर स्ट्रीट | ब | ९३ |
| २. | ७५-७७ सैफी ज्युबिली स्ट्रीट | सी१/२ | ९७ |
| ३. | ३५-४५ ऑगष्ट क्रांती मार्ग | डी-१ | १०३ |
| ४. | २८-५४ शांताराम चाळ, तात्या घारपुरे पथ | डी-१ | १०७ |
| ५. | १५५-१५७ ऑगष्ट क्रांती मार्ग | डी-१ | १११ |
| ६. | ६३-६५ बारा इमाम रोड/६६ चिमणा बुच्चर स्ट्रीट. | सी१/२ | ८७ |
| ७. | ५०७-५११ एस. व्ही. पी. रोड | डी-१ | १२१ |
| ८. | ५६-६४ स्लेटर रोड [शिरिन मंझील] | डी-२ | १९९ |
| ९. | ३४१-३५७ एस. व्ही. पी. रोड, खेतवाडी | डी-१ | २०५ |
| १०. | कोहीनुर मिलचाळ नं. ६ महात्मा ज्योतिबा फुले मार्ग | फ/द | ११७ |
| ११. | २८६ सी इराणी चाळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग | फ/द | ११९ अ |
| १२. | २२ अे इराणी चाळ, डी. एल. मार्ग. | फ/द | ११९ क |
| १३. | १७१-१७९, आर. बी. मार्ग | इ-१ | १२५ |

(20D)

२८

परिशिष्ठ - ब

दिनांक २४.६.९३ रोजी झालेल्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या ८ व्या बैठकीत मंजूर केलेले इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीचे प्रस्ताव.

| अ.क्र. | इमारतीचे नांव | विभाग | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | १७५ झकेरिया मस्जिद स्ट्रीट | ब | ५५ |
| २. | २६० डी. जे. एस. एस. रोड | डी१ | ५९ |
| ३. | १८० अ. जे. एस. एस. रोड | डी१ | १९५ |
| ४. | २२६-२२८ राजाराम मोहन रॉय मार्ग | डी१ | १९३ |
| ५. | २६ ब आर. एस. निमकर मार्ग(इरानीवाळ) | इ-२ | ५३ |
| ६. | ४३ कामाठीपुरा ७ वी गल्ली | इ-२ | ६३ |
| ७. | २१- गली घेलाबाई क्रॉस लेन | इ-२ | ६५ |
| ८. | १२ काझीपुरा स्ट्रीट (३ के डंकन क्रॉस लेन) | इ-२ | ६७ |
| ९. | २८४-२८६ टोपीवाला वाळ/डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग. | फ/द | ६९ |
| १०. | ७८ टेमकर स्ट्रीट आयिया मंझिल | इ-२ | ७१ |
| ११. | ६२ अ साखळी स्ट्रीट | इ-२ | ७३ |
| १२. | ५५६ वसंत भुवन, डॉ. ई. मोझेस रोड | फ/द | ७५ |
| १३. | ३ मोहमदी बिल्डिंग, डॉ. आंबेडकर मार्ग | फ/द | ७७ |
| १४. | ४८ कृष्णा निवास परेल व्हिलेज | फ/द | ८१ |
| १५. | ७७ कामाठीपुरा ५ वी गल्ली ट्रस्ट बिल्डिंग | इ-२ | ८५ |

सचिव

सभापती